# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः18.04.2024 वारःगुरुवार**

---

1. 17 राज्यं आणि चार केंद्रशासित प्रदेशांमधले 102 लोकसभा मतदारसंघ तसंच अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभेसाठी उद्या मतदान.
2. लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होणार
3. अयोध्येसह देशभरात रामनवमी उत्साहात साजरी.
4. भारताची लोकसंख्या जगात सर्वांत जास्त झाल्याचा संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधीचा अंदाज आणि
5. मुलींसाठीच्या तेराव्या युरोपियन गणित ऑलिंपियाडमध्ये भारताला चार पदकं.

**<u>लोकसभा</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उद्या 17 राज्यं आणि चार केंद्रशासित प्रदेशांमधल्या 102 मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, अंदमान आणि निकोबार, लक्षद्वीप, पुदुच्चेरी, उत्तराखंड आणि तमिळनाडूमधल्या सगळ्या लोकसभा मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होईल. याशिवाय राजस्थानमधल्या 12, उत्तर प्रदेशातल्या आठ, मध्य प्रदेशातल्या सहा, आसाम आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येकी पाच, पश्चिम बंगालमधल्या तीन, मणिपूरमधल्या दोन, तसंच छत्तीसगड, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरमधल्या प्रत्येकी एका मतदारसंघामध्ये मतदारांचा कौल मतपेटीत बंद होईल. या टप्प्यात 625 उमेदवार रिंगणात आहेत. केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, तेलंगणचे माजी राज्यपाल तमिलीसाई सुंदरराजन, भारतीय जनता पार्टीचे तमिळनाडूचे प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई, कर्नाटकमधले कॉंग्रेसचे नेते कार्ती चिदंबरम, द्रमुकचे नेते दयानिधी मारन यांच्यासह अनेक दिग्गजांचं भवितव्य उद्या निश्चित होणार आहे.

प्रचाराच्या कालच्या शेवटच्या दिवशी प्रचार मोहीम शिगेला पोचली होती. सर्वच राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी ठिकठिकाणी प्रचार सभा घेतल्या. तसंच उमेदवारांनी मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेण्यावर भर दिला. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याबरोबर अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभांसाठीही शुक्रवारी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यासाठीही जय्यत तयारी करण्यात आली आहे.

**<u>राजीवकुमार आवाहन</u>**

दरम्यान, मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा आणि लोकशाहीचं उत्तरदायित्व दाखवून द्यावं असं आवाहन मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी केलं. युवकांनी निवडणूक सहभागाच्या क्रांतीचं नेतृत्व करावं, असं ते आकाशवाणीशी बोलताना म्हणाले.

**<u>अधिसूचना</u>**

लोकसभा निवडणुकीसाठीच्या चौथ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होणार आहे. या टप्प्यात नऊ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या 96 मतदारसंघांमध्ये तेरा मे रोजी मतदान होणार आहे. आंध्र प्रदेश

आणि ओडिशातल्या विधानसभा निवडणुकीसाठी उद्या अधिसूचना जारी होईल. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत उद्या संपेल. या टप्प्यात 94 मतदारसंघांमध्ये सात मे रोजी मतदान होणार आहे.

**भारत लोकसंख्या**

भारताची लोकसंख्या जगात सर्वांत जास्त असून, ताज्या अंदाजानुसार, ती एक अब्ज 44 कोटींपर्यंत गेली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या लोकसंख्या निधीच्या म्हणजे यूएनएफपीएच्या अहवालानुसार चीनची लोकसंख्या जगात दुसऱ्या क्रमांकावर म्हणजे एक अब्ज 42 कोटी इतकी आहे. भारतातील माता मृत्यू प्रमाणात घट, तसंच सामाजिक आणि आर्थिक स्थितीत झालेली सुधारणा यांमुळे लोकसंख्येत वाढ होत असल्याचं निरीक्षण यूएनएफपीएनं नोंदवलं आहे. भारताची लोकसंख्या 2011च्या जनगणनेनुसार, एक अब्ज 21 कोटी इतकी होती. चीनची लोकसंख्या 2022मध्ये एक अब्ज 42 कोटी 60 लाख इतकी होती. मात्र, त्यानंतर तिच्यात घट व्हायला सुरुवात झाली. भारताच्या लोकसंख्येनं एप्रिल 2023मध्ये चीनच्या लोकसंख्येशी बरोबरी केली. चीनची लोकसंख्या या शतकाच्या अखेरीपर्यंत एक अब्जांच्याही खाली जाऊ शकेल, असा या क्षेत्रातल्या तज्ज्ञांचा अंदाज आहे, तर भारताची लोकसंख्या पुढच्या काही दशकांमध्ये वाढत राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**आयएमएफल**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं जागतिक दृष्टिक्षेप अहवालात आर्थिक वर्ष 2025 साठी भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर 6 पूर्णांक 8 दशांश टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी जानेवारीत हा दर साडेसहा टक्के राहण्याचा अंदाज होता. देशांतर्गत मागणीची परिस्थिती आणि श्रमिक वयातील वाढती लोकसंख्या ही कारणं यासाठी देण्यात आली आहे. दरम्यान, संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार आणि विकास संघटनेनं 2024 मध्ये भारताची अर्थव्यवस्था साडेसहा टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या पुरवठा साखळ्यांमध्ये विविधता आणण्यासाठी देशात त्यांच्या उत्पादन प्रक्रियेचा विस्तार करत असल्याने भारतीय निर्यातीवर सकारात्मक परिणाम होईल असं यात म्हटलं आहे.

**रामनवमी**

देशभरात काल रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. मंदिरातल्या पारंपरिक रामजन्म सोहळ्यासह मिरवणुका, धार्मिक कार्यक्रम, प्रसादवाटप आणि इतर अनेक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. अयोध्येतल्या श्रीरामजन्मभूमी मंदिरात पहिल्याच सूर्यतिलक समारंभासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. काल दुपारी बारा वाजून 16 मिनिटांनी रामलल्लांच्या कपाळावर सूर्याची किरणं पडली आणि भाविकांनी एकच जल्लोष केला. शास्त्रज्ञांनी चार वर्षं घेतलेल्या मेहनतीतून हा सोहळा साकार झाला. श्रीरामसंकीर्तन आणि वेदमंत्रांचा जयघोष यांमुळे विज्ञान आणि अध्यात्म यांचाही संगम झाल्याचं बघायला मिळालं. महाराष्ट्रात अनेक मंदिरांमध्ये पारंपरिक उत्साहात रामनवमी साजरी करण्यात आली.

**बर्डफ्लू**

केरळमध्ये अलप्पुळा जिल्ह्यातील दोन पंचायतींमध्ये बदकांना H5N1 बर्ड फ्लू झाल्याची पुष्टि झाली आहे. बाधित भागाच्या एक किलोमीटर त्रिज्येतील सर्व पाळीव बदकं मारण्याची कार्यवाही जिल्हा प्रशासनानं सुरु केली आहे. भोपाळमधील राष्ट्रीय प्राणी रोग संस्थेनं केरळमधील बर्ड फ्लूची पुष्टि केली आहे.

**काश्मीर हत्या**

काश्मिरात काल अनंतनाग जिल्ह्यातल्या बिजबेहरा भागात दहशतवाद्यांनी बिहारमधल्या एका मजुराची गोळ्या घालून हत्या केली. या घटनेनंतर सुरक्षा दलांनी त्या परिसरात नाकाबंदी केली असून दहशतवाद्यांना पकडण्यासाठी मोठी शोधमोहीम राबवण्यात येत आहे.

**पांडे-उझबेकिस्तान**

लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांनी काल उझबेकीस्तानमध्ये लष्करी दल अकादमीत उच्च माहिती-तंत्रज्ञान प्रयोगशाळेचं उद्घाटन केलं. भारताच्या सहयोगातून ही प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. उभय देशांच्या संरक्षणमंत्र्यांच्या सप्टेंबर 2018 मध्ये झालेल्या चर्चेत भारतातर्फे अशी प्रयोगशाळा उभारण्याचं आश्वासन देण्यात आलं होतं.

**जम्मू-काश्मीर-धूर मुक्त**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, सार्वजनिक आरोग्याचं रक्षण आणि मतदारांची संख्या वाढविण्याच्या उद्देशानं मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व मतदान केंद्रं तंबाखूमुक्त क्षेत्र म्हणून घोषित केली आहेत. मुख्य निवडणूक कार्यालयाला मतदान केंद्रांवर धूरमुक्त वातावरण सुनिश्चित करण्याचे निर्देश काश्मीर आरोग्य सेवा संचालनालयानं दिले आहेत. इतरांच्या धूम्रपानामुळं होणाऱ्या त्रासापासून संरक्षण करण्यावरही यात भर देण्यात आला आहे. याआधी त्रिपुरामध्ये असे निर्देश लागू करण्यात आले आहेत.

**गणित-ऑलिम्पियाड**

मुलींच्या तेराव्या युरोपियन गणित ऑलिंपियाडमध्ये भारतानं दोन रौप्य आणि तीन कास्य पदकं पटकावली आहेत. जॉर्जियामध्ये त्साकाटुबो इथं ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तिरुअनंतपुरम इथल्या संजन चाको आणि गुडगावमधल्या गुंजन आगरवालनं रौप्य, तर हिस्सारच्या लारिस्सा आणि पुण्याच्या सई पाटीलनं कास्य पदक मिळवलं आहे. भारतानं 2015 पासून या स्पर्धेत भाग घ्यायला सुरुवात केल्यानंतर दुसऱ्यांदा पथकातल्या चारही स्पर्धकांना पदक मिळालं आहे.

**उष्णतेची लाट**

पुढच्या चार दिवसांमध्ये ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये उष्णतेची लाट तीव्र होण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे. झारखंड, उत्तर कोकण, सौराष्ट्र, मध्य महाराष्ट्र, आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीचा भाग, तेलंगण, तमिळनाडू आणि पुदुच्चेरीमध्येही उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. देशाच्या पूर्व तसंच दक्षिण भारतातल्या किनारपट्टीच्या भागांमध्ये कमाल तापमान दोन ते तीन अंश सेल्सिअसनं वाढेल तर ईशान्य भारतात पुढच्या रविवारपर्यंत विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज आहे. जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज हवामानशास्त्र विभागानं वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.